# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

## (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

### एक दिवसीय क्रिकेट सामन्यासाठी मेट्रो वेळा वाढवल्या

### रात्री ११.३० पर्यंत धावणार माझी मेट्रो



नागपूर : क्रिकेट चाहत्यांच्या सोयीसाठी महा मेट्रो नागपूर ६ फेब्रुवारी २०२५ रोजी मेट्रो ट्रेन सेवा रात्री ११.३० वाजेपर्यंत वाढवणार आहे. एरवी मेट्रो सेवा सकाळी ६ वाजेपासून रात्री १० वाजेपर्यंत सुरु राहते. भारत आणि इंग्लंड यांच्यात ६ फेब्रुवारी (गुरुवार) रोजी विदर्भ क्रिकेट असोसिएशन (VCA) स्टेडियम, जामठा येथे  वनडे सामना खेळला जाणार आहे.  मेट्रो सेवा न्यू एअरपोर्ट \ मेट्रो स्टेशन किंवा खापरी मेट्रो स्टेशनपर्यंत सर्व मेट्रो स्टेशन्स, त्यातच अंतिम स्थानकं – लोकमान्य नगर, ऑटोमोटिव्ह स्केअर आणि प्रजापती नगर यामधून उपलब्ध असेल.

शेवटची ट्रेन खापरी मेट्रो स्टेशनवरून ११.३० वाजता सुटेल. खापरीहून प्रवासी ऑटोमोटिव्ह स्क्वेअरपर्यंत प्रवास करू शकतील किंवा सीताबर्डी इंटरचेंजवर ट्रेन बदलून अ‍ॅक्वा लाईनच्या कोणत्याही दिशेने प्रवास करू शकतील. मेट्रो ट्रेन्स दार १० मिनिटांच्या अंतराने दिवसभर धावतील. VCA जामठा स्टेडियम न्यू एअरपोर्ट मेट्रो स्टेशनपासून ७ किलोमीटर आणि खापरी मेट्रो स्टेशनपासून ६ किलोमीटर अंतरावर आहे. जामठा स्टेडियम आणि परत येण्यासाठी न्यू एअरपोर्ट स्टेशनवर एनएमसी बसेस उपलब्ध असतील (पेमेंट आधारित).

क्रिकेट चाहत्यांना मॅचनंतर ट्रॅफिक जाम टाळण्यासाठी महा मेट्रोच्या सेवांचा वापर करून आपल्या घरी पोहोचण्याची सुविधा मिळेल. महामेट्रो नागपूरच्या क्रिकेट प्रेमी नागरिकांना रस्त्यांवरील गर्दी टाळण्यासाठी आणि जलद प्रवासासाठी मेट्रो वापरण्याचे आवाहन करत आहे.